# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 15/03/2023 (बुधवार) सायंकाळ

---

## अवैध रेती (गौणखनिज) साठा तसेच चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध

## पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण यांची धडक मोहीम

मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण यांनी दिलेल्या आदेशावरून स्थानिक गुन्हे शाखेतील पथकाने अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या तसेच साठा ठेवणाऱ्या आरोपीतांविरूद्ध धडक कारवाई करून पोस्टे उमरेड व कुही येथे दिनांक १३/०३/२०२३ व दिनांक १४/०३/२०२३ रोजी विविध घटनास्थळावर रेड टाकुन अवैध रेतीचा साठा ठेवणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई करून त्यांचेकडुन एकुण १४० ब्रास रेतीचा साठा किमती अंदाजे ४,५०,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीताविरूद्ध कारवाई करून त्यांचेकडुन वाहतुक वापरणाऱ्या ट्रक व ट्रॅक्टर असे ०३ ट्रक व ०१ ट्रॅक्टर यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन १९ ब्रास रेती असा एकुण वाहनासह ६९,५८,०००/—रूपयाचा मुद्देमाल आरोपीतांच्या ताब्यातून जप्त करून त्यांचेविरूद्ध एकुण ०६ कारवाई करण्यात आल्या. नमुद अवैधरीत्या विनापरवाना रेती (गौणखनिज ) ची चोरटी वाहतुक व साठा करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध आळा घालुन दंडात्मक कारवाई करण्याकरीता मा. तहसिलदार उमरेड व कुही यांना पत्रव्यवहार करण्यात आला.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीण पोलीस अधीक्षक मा. श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस हवालदार नरेंद्र पटले, राजेश रेवतकर, मयुर ढेकळे, अरविंद भगत, नापोशि बालाजी साखरे, अजीज, आशिष मुंगळे, किशोर वानखेडे, उमेश फुलबेल, अमृत किनगे, चालक आशुतोष लांजेवार यांचे पथकाने पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर